# वसई-विरार शहर महानगरपालिका
## लेखा विभाग मुख्यालय

दि.१२/०२/२०२४

**प्रेसनोट**

वसई विरार शहर महानगरपालिकेचा सन २०२३-२४ च्या सुधारित अर्थसंकल्पासह सन २०२४-२५ चा मूळ अर्थसंकल्प आज दि.१२ फेब्रुवारी, २०२४ रोजी वसई विरार शहर महानगरपालिकेचे मा.आयुक्त यांचे वतीने अतिरिक्त आयुक्त श्री.रमेश मनाळे, यांनी मा.प्रशासक श्री.अनिलकुमार पवार यांना सादर केला.

सदर अर्थसंकल्प सन २०२३-२४ चा सुधारीत रु.२९६८.०६ कोटी व सन २०२४-२५ चा मूळ रु.३११२.०७ कोटींचा असून रु.१२.३३ कोटी शिलकेचा आहे. सन २०२३-२४ या चालू वर्षामध्ये आर्थिक शिस्तीचे पालन करण्यात आले असून सन २०२४-२५ च्या मुळ अंदाजपत्रामध्ये कोणतीही कर वाढ सुचविण्यात आलेली नाही.

सदर अंदाजपत्रक सादर करतेवेळी महानगरपालिकेचे मा.अतिरिक्त आयुक्त श्री.रमेश मनाळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.इंद्रजीत गोरे, मुख्य लेखा परीक्षक श्री.सुरेश बनसोडे, उप-मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.अभय देशमुख, महानगरपालिकेचे सर्व अधिकारी, विभागप्रमुख, पत्रकार व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

या अंदाजपत्रकावर चर्चा / विचारविनिमय होऊन सदरचे अंदाजपत्रक मा.प्रशासक यांचेकडून अंतीमरित्या मंजूर करण्यात येईल. तत्पूर्वी त्यामध्ये काही सूचना/सुधारणा असतील तर सन्माननीय लोकप्रतिनिधी, सन्माननीय करदाते नागरिक, मिडिया प्रतिनिधी यांनी महानगरपालिकेस दि.१५ फेब्रुवारी, २०२४ रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात असे आवाहन मा.प्रशासक श्री.अनिलकुमार पवार यांनी केले.

सविस्तर तपशील असलेले मा.आयुक्त यांचे अर्थसंकल्पीय भाषण सोबत जोडले आहे.

**लेखा विभाग मुख्यालय**
**वसई विरार शहर महानगरपालिका**